# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः08.07.2024** **वार : सोमवार**

---

**ठळक बातम्या**

- कृषी नेतृत्व समितीचा सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार महाराष्ट्राला जाहीर

- महावितरणच्या तीनही वीज कंपन्यांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतन आणि भत्त्यात वाढ

- जम्मू आणि काश्मीरमध्ये अकोल्याचे जवान प्रवीण जंजाळ यांच्यासह दोघांना वीरमरण, सहा दहशतवादी ठार

- महिला क्रिकेटमध्ये भारत-दक्षिण आफ्रिका दुसऱ्या सामन्यावर पावसाचं पाणी आणि

- कोल्हापूर, कोकणमध्ये मुसळधार, अनेक नद्या धोक्याच्या पातळीवर

**कृषी पुरस्कार**

15 व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीचा 2024 चा सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार महाराष्ट्राला जाहीर झाला आहे. माजी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती पी. सदाशिवम यांच्या अध्यक्षतेखालील 15 व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने नुकतीच ही घोषणा केली. नवी दिल्लीत परवा 10 जुलै रोजी होणाऱ्या सोहोळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हा पुरस्कार स्वीकारणार आहेत. या पुरस्कारांसाठी समितीने राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षितता यांच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेतली असल्याची माहिती राज्याच्या कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली आहे. बांबू लागवड, तृण धान्य- श्री अन्न अभियान आणि औष्णिक वीज निर्मितीत बायोमासचा, शिर्डी आणि मुंबईसह शक्य त्या सर्वच विमानतळांच्या ठिकाणी कार्बन उत्सर्जन कमी करण्याकरता पोलाद आणि अन्य धातूंऐवजी बांबूचा वापर करण्यावर भर देण्याचं धोरण - या सगळ्या गोष्टी विचारात घेऊन महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार मिळाला आहे.

**नीट**

नीट युजी परीक्षेशी संबंधित 26 याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या याचिकांमध्ये परीक्षेतील कथित अनियमिततेबाबत स्वतंत्र चौकशीची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान केंद्रानं प्रतिज्ञापत्र दाखल केलं असून परीक्षेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचा कोणताही पुरावा नसताना ही परीक्षा पुन्हा आयोजित करण्याची गरज नसल्याचं म्हटलं आहे. नव्याने परीक्षा घेतल्यास प्रामाणिक उमेदवारांवर त्याचे विपरित परिणाम होतील, असा दावा सरकारनं केला आहे.

**वेतनवाढ**

महावितरणच्या तीनही वीज कंपन्यांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात 19 टक्के आणि सर्व भत्त्यांमध्ये 25 टक्के वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. वीज कंपन्यांच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं वेतन पुनर्निर्धारण करण्याबाबत काल एक बैठक झाली; त्यावेळी ते बोलत होते.

**शपथ**

राज्य विधान परिषदेच्या शिक्षक तसंच पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत विजयी झालेल्या निरंजन डावखरे, किशोर दराडे आणि जगन्नाथ अभ्यंकर यांना आज विधानपरिषद सदस्य म्हणून शपथ दिली जाणार आहे. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे सदस्यांना शपथ देतील.

**गडकरी**

भविष्यातील गरज ओळखून तरुणांमध्ये कौशल्य विकसित करा, असं आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी औद्योगिक कंपन्यांना केलं आहे. वेदिक-महिंद्रा कौशल्य विकास केंद्राचं उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते काल नागपूरमध्ये झालं; त्यावेळी ते बोलत होते. विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रीज असोसिएशन, महिंद्रा ट्रॅक्टर्स, आणि यंत्र इंडिया लिमिटेडनं संयुक्तपणे या केंद्राची निर्मिती केली आहे.

**गजानन पालखी**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींचा पायी वारी - पालखी सोहळा आज दुपारी महानैवेद्य आरती झाल्यावर तरडगाव कडे प्रस्थान ठेवणार आहे. माऊलींच्या पहिल्या उभ्या रिंगणाचा सोहळा चांदोबाचा लिंब इथे पारंपरिक पद्धतीने होईल. संत श्री तुकाराम महाराज पालखीचा आजचा मुक्काम अंथुर्णे इथं आहे.

आषाढी वारीसाठी पंढरपूरला पायी निघालेल्या शेगावच्या श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचं काल धाराशिव शहरात आगमन झालं. या पालखीचं नागरिकांनी उस्फुर्त स्वागत केलं. ही पालखी उद्या तुळजापूर मार्गे पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे.

दरम्यान पंढरपूरमधील विठ्ठल रुक्मिणी मंदिर - दर्शनासाठी 24 तास उघडं राहणार असल्याची माहिती विठ्ठल मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**जगन्नाथ**

श्री जगन्नाथ पुरी यात्रेच्या निमित्तानं नाशिकमध्येही काल  पंचवटीत भगवान श्री जगन्नाथ  रथ यात्रा काढण्यात आली होती. जय जगन्नाथ, जय जय जगन्नाथ असा जयघोष शेकडो करत भाविकांनी हा रथ ओढला. यावेळी पर्यावरण रक्षण, नदी सुरक्षा यासारख्या विविध विषयांवर जनजागृती करण्यात आली.

**संपूर्णता**

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड इथे संपूर्णता अभियानाला सुरुवात झाली आहे. प्रभातफेरी, पोषण आहारासंबंधीच्या दालनाच्या माध्यमातून अमृत आहार थाळी आणि इतर स्थानिक पोषक पदार्थांचं सादरीकरण काल करण्यात आलं. गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम यांनी संपूर्णता अभियानाविषयी माहिती दिली.

**पेरणी**

सोलापूर जिल्ह्यात यंदा हंगामाच्या सुरुवातीलाच दमदार पाऊस पडल्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या वेगाने झाल्या आहेत. कृषी विभागाने यंदा खरीपासाठी 2,89,576 हेक्टर क्षेत्र गृहीत धरुन हंगामाचं नियोजन केलं होतं. मात्र यंदा सोलापूर जिल्ह्यात जवळपास ३ लाख ३० हजारहून अधिक हेक्टर क्षेत्रावर खरीपाच्या पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. सर्वाधिक 97038 हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झालेली आहे.

**ठाकरे**

आगामी विधानसभा निवडणूक - महाराष्ट्राच्या अस्मितेची लढाई असेल, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख - उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथे झालेल्या शिवसंकल्प मेळाव्यात बोलत होते.

**हुतात्मा**

जम्मू आणि काश्मीरमध्ये कुलगाम जिल्ह्यात काल सुरक्षा दलं आणि दहशतवादी यांच्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या चकमकीत- सहा दहशतवादी ठार झाले तर दोन जवानांना वीरमरण आलं. दोन वीर जवानांमध्ये अकोला जिल्ह्यातील मोरगाव भाकरे गावातील प्रवीण जंजाळ यांचा समावेश आहे; 2019 मध्ये प्रवीण जंजाळ हे भारतीय सैन्य दलात दाखल झाले होते. मोरगाव भाकरे या गावात त्यांच्या पार्थिव देहावर लष्करी इतमामात आज अंत्यसंस्कार होणार आहेत.

**क्रिकेट**

झिम्बाब्वेविरुद्धच्या वीस षटकांच्या मालिकेतला दुसरा सामना काल भारतानं 100 धावांनी जिंकला. नाणेफेक जिंकून फलंदाजी स्वीकारली; भारतानं 2 गडी गमावून 234 धावा केल्या. अभिषेक शर्माने 8 षटकारांसह 47 चेंडूत शतक ठोकलं. प्रत्युत्तरादाखल झिम्बाब्वेनं सर्वबाद 134 धावा केल्या. पाच सामन्यांच्या या मालिकेत आता दोन्ही संघ 1-1 असे बरोबरीत आहेत.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका वीस षटकांचा सामना काल चेन्नई इथे पावसामुळे रद्द करावा लागला. पाहुण्यांनी 20 षटकात सहा बाद 177 धावा केल्या. पण भारतीय संघ एकही चेंडू खेळू शकला नाही. तीन सामन्यांच्या या मालिकेत दक्षिण आफ्रिका 1-0 आघाडीवर आहे. अंतिम सामना उद्या चेन्नईतच खेळवला जाणार आहे.

**स्टीपलचेस**

भारताच्या अविनाश साबळेनं 3 हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात फ्रान्समध्ये पॅरीस डायमंड लिग स्पर्धेत काल एका नवा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. 8 मिनिटं 9 सेकंद आणि 91 शतांश सेकंद - वेळ नोंदवत साबळे - या स्पर्धेत सहावा आला. यापूर्वीचा विक्रम त्याच्याच नावावर होता.

**पाऊस**

कोकणसह कोल्हापूर जिल्ह्यात काल मुसळधार पाऊस पडला. सिंधुदुर्गात सर्वदूर झालेल्या मुसळधार पावसाने जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झालं आहे. महामार्गालगतच्या वेताळबांबर्डे गावातील अनेक घरांना पुराच्या पाण्याचा वेढा बसला आहे. जिल्ह्यातील सर्वच नद्या पूरपातळीवरून वाहत आहेत. कुडाळ तालुक्यात माणगाव खोऱ्यात बरेच पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे मुक्कामी गेलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या गाड्या अडकून पडल्या आहेत. तर काही ठिकाणी पडझड होऊन मालमत्तेचे नुकसान झालं आहे. मुंबई गोवा महामार्गावर पणदूरजवळ पाणी आल्याने वाहतूक

ठप्प होवून अनेक ठिकाणी पडझडीच्या घटनाही घडल्या आहेत. नदीकाठच्या लोकांना प्रशासनाने सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यात रात्री 10 वाजताच्या स्थितीनुसार, खेड तालुक्यातली जगबुडी, संगमेश्वर तालुक्यातली शास्त्री आणि राजापूर तालुक्यातली कोदवली या नद्या *धोका पातळीच्या वरून* वाहत आहेत. संगमेश्वर तालुक्यातली सोनवी आणि लांजा तालुक्यातल्या काजळी आणि मुचकुंदी या नद्या *इशारा पातळीच्या वरून* वाहत आहेत. जिल्ह्यातल्या शाळा-महाविद्यालयांना आज सुटी जाहीर करण्यात आली आहे.

मुसळधार पावसामुळे कसाऱ्यापासून मुंबईकडे जाणारी रेल्वे वाहतूक ठप्प झाल्याने नाशिकहून मुंबईला जाणाऱ्या पंचवटी एक्सप्रेससह अनेक रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्याने प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात पावसाचा जोर कायम आहे. पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. जिल्ह्यातील 50 बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

**हवामान**

हवामान - मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकणातही अति जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्कार.**